मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१२५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# मी यापुढे निवडणूक लढणार नाही:लोकांना विकास नकोय,जाती पातीचे राजकारण सुरू आहे; अब्दुल सत्तार यांची मोठी घोषणा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिल्लोड (वृत्तसंस्था)**

शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनी यापुढे निवडणूक न लढवण्याची घोषणा केली आहे. सिल्लोड येथील अंभई येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना अब्दुल सत्तार यांनी ही घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. कार्यक्रमात बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले, मी आमदार–मंत्री असताना १८–१८ तास सालदार महिनदार सारखे काम केले. शासकीय योजनेचा लाभ अनेक महिलांना व कामगारांना मिळवून दिला, मतदारसंघाचा विकास केला, पण शेवटी जाती पातीवर निवडणूक झाली व माझा विजय २४२० मतांनी झाला. लोकांना विकास नकोय, जाती पातीवर निवडणुका होत असतील तर आगामी सिल्लोडची नगर परिषद माझी शेवटची निवडणूक राहील. मी यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही, अशी थेट घोषणाच अब्दुल सत्तार यांनी केली आहे.

पुढे बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले, मी मतदारसंघाचा विकास केला, पण शेवटी जाती पातीवर निवडणूक झाली, लोकांना विकास नकोय, तर जाती पातीवर निवडणुका हव्यात. आगामी सिल्लोडची नगर परिषद माझी शेवटची निवडणूक राहील, मी यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही. कामगारांची नोंदणी करण्यासाठी यंत्रणा राबवली, सिल्लोड सोयगाव मतदार संघाचा विकास केला, सूतगिरणी, मेडिकल कॉलेज, एमआयडिसी आणली. शेतकरी बागायतदार व्हावा, यासाठी पूर्णा नदीवर बेरिजेस बांधण्याच्या कामाला मंजुरी घेतली. आमदार व मंत्री असतांना कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. पण, विरोधक काहीच कामे न करता, त्यांना माझ्याबरोबरीने मतदान मिळते. विरोधक जाती पातीवर निवडणूक लढवतात, हे राजकारण घातक आहे. जर विकासाला प्राधान्य मिळत नसेल व केवळ जाती पातीवर निवडणुका होत असेल, तर लोकांनी मला आतापर्यंत निवडून दिले त्यांचे आभार, पण मी आता यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही, अशी खंत अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केली. तसेच मी माझा मुलगा, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर याला सांगितले की, मी निवडणूक लढणार नाही, तुला लढायची असेल, तर बघ नाहीतर जय हिंद जय महाराष्ट्र, असे अब्दुल सत्तार म्हणाले.



## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये दीनदयाल विद्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी श्री. समर्थ कॉलेज, देऊळगावराजा येथे तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये निबंध स्पर्धा, स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धा,प्रश्नमंजुषा स्पर्धा तसेच विज्ञान उपकरण प्रदर्शनी अशा विविध स्पर्धांचा त्यामध्ये समावेश होता.दीनदयाल विद्यालय दे. राजा येथील एकूण २७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. तसेच माध्यमिक गटातून शिक्षिका सौ. मगर मॅडम यांनी सहभाग नोंदवला होता,यामध्ये स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धेमध्ये माध्यमिक गटातून वैभव नामदेव घोंगडे प्रथम क्रमांक तसेच माध्यमिक गटातून प्रांजल गणेश मुळे निबंध स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक, प्राथमिक गटातून वेस्ट वॉटर मॅनेजमेंट या उपकरणाचा द्वितीय क्रमांक तसेच माध्यमिक गटातून इलेक्ट्रिक रोड या उपकरणाचा तृतीय क्रमांक व माध्यमिक गटातून शिक्षकांमधून सौ संगिता मगर मॅडम यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.




या विद्यार्थ्यांचे कौतुक व बक्षिस वितरण दीनदयाल विद्यालय दे. राजा येथे करण्यात आले. हा कार्यक्रम विद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. गारडे सर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक मा. श्री. व्यास सर यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विज्ञान विभाग प्रमुख व मार्गदर्शक सौ. सांगळे मॅडम यांनी केले तसेच आभार प्रदर्शन श्री. काकड सर यांनी केले. विद्यार्थ्यांना सर्व विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

## भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब व दिव्यांग नागरिकांना मायेची ऊब ;शिवशंकर काळे यांचा उपक्रम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टीचे पंचायतराज व ग्रामविकास विभाग मराठवाडा सह – संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य शिवशंकर काळे यांनी येथील गोरगरीब व दिव्यांग नागरिकांना थंडीपासून बचाव करण्यासाठी ब्लॅकेटचे वाटप करत मायेची ऊब दिली आहे.



सध्या ग्रामीण भागात थंडीची लाट पसरत असल्याने गोरगरीब व दिव्यांग नागरिकांना थंडीपासून बचाव करण्यासाठी ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. शिवशंकर काळे हे पंचक्रोशीत उल्लेखनीय कामगिरी करताना पक्षाचे कार्यकर्ते म्हणून समजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. मागील दहा ते पंधरा वर्षांपासून ग्रामपातळीवर राहून गोरगरीब नागरिकांचे समाजकार्य करतात. शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. आज परिसरात नागरिकांची जवळकीता वाढलेली आहे. दि.१३ जानेवारी रोजी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ब्लॅकेटचे वाटप करून मायेचा आधार दिला आहे त्याच्या या उपक्रमा बद्दल नागरिकांनी आभार मानले आहे. समाजातील दुर्लक्षित वर्गाकडे भाजपाचे पंचायतराज व ग्रामविकास विभाग मराठवाडा सह –संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य शिवशंकर काळे यांनी वाटप केले आहे.

## आज भगवानगडावर श्री संत भगवानबाबांचा पुण्यतिथी महोत्सव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भगवानगड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचं दैवत श्री संत भगवानबाबा यांची मंगळवार दि.१४ जानेवारी रोजी ६० वी पुण्यतिथी आहे. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडावर भव्य दिव्य मंडप उभारला आहे. सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद बनवला आहे. वाहनांच्या पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था केलेली आहे. पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अनेक संस्थानांहून व गावांतून लहान–मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर येत आहेत.



मठाधिपती, ह.भ.प. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय काटेकोरपणे सर्व देखरेख केली जात आहे. मंगळवारी सकाळी ९ वाजता ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा होईल. सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन व दुपारी १ वाजता महाप्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

### विशेष आकर्षण–महंत शास्त्रीजींचे कीर्तन

**श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती तथा वारकरी संप्रदायाचे भूषण ह.भ.प.न्यायाचार्य श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांचे कीर्तन म्हणजे रसिकांसाठी एक पर्वणीच असते. मंगळवारी श्री संत भगवानबाबा यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्ताने महंत शास्त्रीजींचे काल्याचे कीर्तन होणार आहे. तरी सर्व भाविक–भक्तांनी वेळेवर श्री क्षेत्र भगवानगडावर हजर राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.**

## राजमाता जिजाऊ,स्वामी विवेकानंद जयंती इंदिरा सार्वजनिक वाचनालयात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव शहरातील इंदिरा सार्वजनिक वाचनालय येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यांप्रसंगी ग्रंथ प्रदर्शन मांडण्यात येऊन वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभिनव उपक्रम हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रंथालयाचे अध्यक्ष रा. ना. मेटकर हे होते, तर प्रमुख पाहुणे माजी मुख्याध्यापक किशनराव खिसे,ग्रंथालय कर्मचारी सौ. आशा मेटकर, दिगंबर झुंजारे, शालेय विध्यार्थी व विध्यार्थीनी उपस्थित होते.यावेळी कु.पूजा पांडे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर




माहिती सांगून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे श्री किशनराव खिसे यांच्या हस्ते कु. पूजा पांडे हिस ग्रंथ व पारितोषिक देऊन तिचा गौरव करण्यात आला.याप्रसंगी मान्यवरांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्यावर प्रकाश टाकून महापुरुषांच्या विचाराचा आदर्श घेऊन जीवनाची वाटचाल करावी असे आवाहन करण्यात आले. शेवटी ग्रंथालयाचे लिपिक श्री दिगंबर झुंजारे यांनी सर्वांचे आभार मानले.




## ज्ञानवर्धिनी विद्यामंदिर तळेगाव ढमढेरे येथे गुणवत्ता समितीकडून तपासणी

### अभियानातून शाळांचे प्रगतीपुस्तक तयार होणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शालेय स्तरावर विविध उपक्रम व अभियान राबविले जातात.विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागावी यासाठी शालेय स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले जातात.गुणवत्तेबरोबरच शाळांचे प्रशासकीय कामकाज सुधारण्यासाठी पुणे जिल्हा परिषद व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान हातात घेतले आहे.त्यामध्ये शाळांची तपासणी करण्यात येणार आहे. शाळांची सर्व माहिती एकत्रित करून त्याचे प्रगतीपुस्तक तयार करण्यात येणार



आहे.शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे.

याच अनुषंगाने गुणवत्ता संवर्धन अभियान– २०२४–२०२५ .शालेय निरीक्षण पर्यवेक्षण या दृष्टीने शिक्षण विभागातील विविध बाबींना स्पर्श करणारा हा उपक्रम तळेगाव ढमढेरे येथील ज्ञानवर्धिनी विद्यामंदिर इंग्रजी व सेमी माध्यम आणि ज्युनियर कॉलेज या ठिकाणी पार पडला .याप्रसंगी तपासणी पथकाचे प्रमुख मा.श्री. क्षीरसागर सर, मा.श्री.थिटे सर, मा.श्री. दहिफळे सर,व मा.श्री. दरेकर सर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.तसेच शाळेत घेण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांबद्दल कौतुक केले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका वीरमाला बिराजदार मॅडम तसेच शाळेच्या सर्व शिक्षिका उपस्थित होत्या.

शिक्षण हक्क कायद्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेचा विषय कायमच ऐरणीवर आलेला आहे. त्यामुळे, पुणे जिल्हा परिषद आणि पुणे जिल्हा माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्यावतीने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत सर्व शाळांची तपासणी करण्यात येणार आहे.हा निर्णय कौतुस्कापद आहे. यामधून अध्यापनाला नवी दिशा मिळणार आहे. अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापक वीरमाला बिराजदार यांनी दिली.

**श्री संत भगवानबाबा यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांनी लिहिलेला विशेष लेख....**


# ऐश्वर्यसंपन्न संत श्री. भगवानबाबा पुण्यतिथी विशेष


लोकनेता न्यूज नेटवर्क

महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने व सहवासाने पावन झालेली भूमी आहे. इथे वेगवेगळ्या कालखंडामध्ये अनेक विभूतींनी जन्म घेऊन आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवलेला आहे. एकोणीसाव्या शतकामध्ये महाराष्ट्राच्या विशेषतः मराठवाड्याच्या उद्धारासाठी अशाच एका महान विभूतीने जन्म घेतला, त्या विभूतीचं नाव आहे श्री संत भगवानबाबा. इ.स.१८९६ साली श्रावण वद्य पंचमीच्या दिवशी सावरगांव (घाट), ता.पाटोदा जि.बीड या गावी श्री संत भगवानबाबा यांचा जन्म झाला. वडील तुबाजी पाटील व आई कौतिकाबाई यांचे हे चौथे अपत्य होय. योग्याचा बांधा असलेले, देखणे पण अबोल स्वभावाचे बाबा होते. बालपणी त्यांना सर्वजण 'आबा' म्हणायचे. वयाच्या अकराव्या वर्षी बाबा आपल्या आजोळी, शिरुर तालुक्यातील लोणी या गावी आले. श्री क्षेत्र नारायणगडाचे तत्कालीन महंत श्री.माणिकबाबा दौऱ्यानिमित्त लोणी येथे आले होते. त्यांनी बाबांना पाहिलं व आईला म्हणाले, 'हा मुलगा मला द्या.' संतापुढे नम्र झालेल्या आईने जड हृदयाने, पाणवलेल्या डोळ्यांनी बाबांना श्रीगुरुचरणी अर्पण केले. श्रीगुरु माणिकबाबा यांनी आबांचे 'भगवान' असे नामकरण केले. गुरुसेवेत व तपश्चर्येत बाबांचे जीवन जाऊ लागले. मंत्रजप, तपश्चर्या, तारुण्य, ब्रम्हचर्य या सात्विक गुणांनी बाबांचं जीवन ऊजळू लागलं. अगोदरच देखणे; त्यात अध्यात्माचा अलंकार मिळाला. त्यामुळे बाबांचं व्यक्तिमत्व तेजःपुंज दिसू लागलं.

वृद्ध झालेले श्रीगुरु माणिकबाबा यांनी आपल्या दौऱ्याचा कार्यभार बाबांवर सोपविला. मराठवाड्यातील प्रत्येक खेडोपाडी जाऊन, तेथील लोकांना पवित्र तुळसीच्या माळा घालून प्रथम निर्व्यसनी बनविले. त्या काळात सर्व समाज निरक्षर होता. 'एकर विका; पण मुलांना शिकवा' हा बाबांचा उपदेश असायचा. शिक्षण जागृतीचे काम बाबांनी मोठ्या प्रमाणात केले. साधारण १९२० मध्ये बाबांनी प्रथम नारायणगडाहून पंढरपुरसाठी दिंडी काढली. कदाचित ही मराठवाड्यातील पहिलीच दिंडी असावी. त्यानंतर संत एकनाथ महाराजांच्या षष्ठीच्या निमित्ताने दुसरी दिंडी बाबांनी काढली. आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या त्या काळातील बुलढाणा जिल्ह्यासह मराठवाड्यात बाबांनी आध्यात्मिक क्रांती केली. सर्वसामान्य जनतेला मानवी जीवनाचा बोध केला. मनुष्यजन्माचं, बुद्धीचं महत्त्व पटवून दिलं. आता प्रसिद्धीस पावलेले बहुतांश मराठवाड्यातील संत हे श्री संत भगवानबाबांचे शिष्य आहेत. मुळातच अध्यात्माचा मार्ग त्यांनी सर्व जाती-जमातींसाठी मोकळा केला होता. बाबांच्या पूर्वी संस्थानिक महंत कोणीच नव्हते; फक्त त्यांचे श्रीगुरु माणिकबाबा होते.

श्री संत भगवानबाबांच्या गळ्यात संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांची सोन्याची समाधी होती. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'गुरुपरंपरा' आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आद्य असून, पैठणचे श्री संत भानुदास महाराज ज्यांनी श्री विठ्ठलाला कर्नाटकमधून पुन्हा पंढरपूरला आणले. त्यांची पाचवी पिढी शांतीब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज. श्री संत जनार्धनस्वामी हे जरी नाथ महाराजांचे गुरु असले, तरी श्री विठ्ठल उपासना ही पारंपरिकच आहे. नाथ महाराजांचे शिष्य श्री गावबा व त्यांचे शिष्य श्री अनंत महाराज हे मूळ पैठणचेच. त्यांचे शिष्य श्री नगद नारायण महाराज ज्यांनी अंदाजे ३०० वर्षांपूर्वी नारायणगडाची स्थापना केली. नारायणगडाची सातवी पिढी म्हणजे श्री संत भगवानबाबांचे श्रीगुरु श्री माणिकबाबा होय. आठवे महंत म्हणून श्री भगवानबाबांनी बरेच वर्षे नारायणगडावर काढली; परंतु वादविवाद



अत्याधिक झाल्याने त्यांनी नवीन गडाची स्थापना १९५१ मध्ये दसऱ्याच्या दिवशी केली. आजतागायत श्री क्षेत्र भगवानगडावर स्थापनेचा दिवस म्हणून 'दसरा' साजरा केला जातो. संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक भगवानगडाचं दर्शन घेऊन जातात.

शैक्षणिक क्रांतीत सहभागी होताना बाबांनी अनेकांना शाळा काढण्याची प्रेरणा दिली. श्री क्षेत्र भगवानगडावरही त्यांनी विद्यालय सुरु केले. भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, हे त्यांनी काही ग्रामीण व सुशिक्षित लोकांसह औरंगाबाद येथे स्थापन केले. त्यासाठी जागाही घेतली. उच्च शिक्षण घेता यावं म्हणून त्यांनी औरंगाबादमध्ये अजबनगर, क्रांती चौकात 'भगवान छात्रालय' काढले. त्या छात्रालयातील अनेक विद्यार्थी पुढे नामवंत झाले. या शिक्षण जागृतीसह बाबांचं मुख्य कार्य म्हणजे मनुष्य अंधश्रद्धा विमुक्त झाला पाहिजे.

अनेक गावांतून त्यांनी पशुहत्या बंद केली. भोगलवाडी येथे रेडा मारायचे. वडवणी तालुक्यातील चिंचवण येथे गायीची हत्या होत होती. मिडसांगवी येथे बकरे मारले जायचे. या हत्या बंद करून त्यांनी लोकांना नवीन दृष्टी दिली. १ मे १९५८ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हातून श्री क्षेत्र भगवानगडावर श्री विठ्ठलाच्या मूर्तीची व श्री रुख्मिणी मातेच्या पादुकांची स्थापना झाली. तेव्हापासून आजपर्यंत शुद्ध एकादशीला लाखो भाविक वारीला येतात. क्रांतिसिंह नाना पाटील, बाळासाहेब भारदे, स्वामी सहजानंदजी भारती आदी थोर व्यक्ती बाबांच्या सहवासात आल्या होत्या.

श्री संत भगवानबाबांनी अनेक ठिकाणी अध्यात्माची केंद्रे स्थापन केली. अनेक संतांना सहकार्य केले. बीड जिल्ह्यातील रामगड, विठ्ठलगड, गोरक्षनाथ टेकडी, राजा हरिश्चंद्र संस्थान, उत्तरेश्वर पिंप्री इत्यादिकांचे ते प्रेरकच होते. स्त्रियांनाही त्यांनी त्या काळात समानतेचा न्याय दिला. केजमधील श्री शेषाबाई महाराज, महासांगवीच्या श्री मीराबाई महाराज इत्यादिकांना संस्थाने निर्माण करुन दिली. श्री क्षेत्र गहिनीनाथगडाची मोजणी तर बाबांनी आपल्या स्वतःच्या फेट्याने केली. त्यावेळी श्री संत वामनभाऊ म्हणाले होते की, 'माझ्या म्हातारपणात मला हे झेपणार नाही. तू लक्ष्मीकांत आहे.' तेव्हा बाबा म्हणाले, 'तुम्ही काही चिंता करु नका ! मी हे करून देतो.' बाबा शब्दाला जागले. त्यांनी भगवानगडाचं काम अर्धवट सोडून आपले गवंडी व घडविलेले दगडं गहिनीनाथगडावर पाठवून दिले. पौष वद्य प्रतिपदा या तिथीला १९ जानेवारी १९६५ या दिवशी बाबांचे शरीर शांत झाले. तेव्हापासून श्री संत भगवानबाबांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी पौष वद्य प्रतिपदेला लाखो भक्त श्री क्षेत्र भगवानगडावर येऊन आपली श्रद्धा अभिव्यक्त करतात. त्यांचं चरित्र आजही भक्तांच्या मुखी आहे. त्यांचा सहवास लाभलेले भक्तजन आजही त्यांच्या आठवणीने भावनाविवश होतात. त्यांच्याबद्दल एवढंच म्हणावसं वाटतं :

**गेले दिगंबर ईश्वर विभूती ।।**
**राहिल्या त्या कीर्ती जगामाजी ।।**

दसरा आणि पुण्यतिथी हे दोन दिवस मुख्य असतात. गुरुमंत्रदीक्षा ही दसऱ्याला रात्री दिली जाते. आध्यात्मिक क्रांतीसह सर्व मनुष्यमात्रांना शैक्षणिक उंची मिळावी, यासाठी श्री संत भगवानबाबा अहोरात्र चंदनासारखे झिजले. त्यांचा सुगंध आजही दरवळत आहे. त्यांचं व्यक्तिमत्त्व हे माऊलींच्या शब्दांत खालील ओवीप्रमाणे होते :

**चंद्रमे जे अलांछन श्र मार्तंड हे तापहीन ।।**

## कामगार संघटना २०२५ ची नूतन कार्यकारणी गठित



लोकनेता न्यूज नेटवर्क । देगलुर । मधुकर शिरेवार

दिनांक १२/०१/२०२५ रोजी सुधाकर चंद्रवार यांच्या शेतामध्ये महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे २०२५ नूतन कार्यकारणी गठीत करण्यासाठी सर्व सभासद यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. दुपारी २.३० वाजता नियोजित बैठक सुरुवात झाली या बैठकीमध्ये माजी अध्यक्ष एस आय चंद्रावर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली या बैठकीमध्ये मधुकर शीरेवार हे ई. स.२०२४ च्या वर्षांचा अहवाल वाचून दाखवले आहे. त्यानंतर २०२५ ची नूतन कार्यकारणी गठीत करण्यासाठी सर्व सभासद एकनिष्ठ राहून अध्यक्ष म्हणून श्री एस एस बाचावार यांची निवड करण्यात आली आणि सचिव पदी श्री मधुकर शिरेवार यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीला खालील सभासद उपस्थित होते. श्री एम. ए. नजीर, बी. जी. इबितवार, एसजी शिंदे डी एस वाघमारे एस. व्ही. वदेवार, एस आर देशमुख, अब्दुल रझाक, आकलाख, शेख शादुल, असे अनेक एकनिष्ठ सभासद हजर होते. नूतन अध्यक्ष सचिव यांचा पुष्पहार घालून अभिनंदन करण्यात आले त्यानंतर जेवण करण्यात आले आहे.

**क्र.२०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार**
**सिंदखेड राजा**
**दि. ०१/०१/२०२५**

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस तालुका सिंदखेड राजा यांना जाहिर केले जाते की, अर्जदार श्री.प्रकाश भिकाजी गित्ते रा.बुद्ध. ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांनी नामे भिकाजी तुकाराम गित्तं यांचा मृत्यु दि.०८/०५/१९९८ रोजी राहत्या घरी ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे जन्म झाला असून अर्जदारांनी स्वतः सदरहू कायदेशीर मृत्यु नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराच्या कायदेशीर जन्म दिनांक दि.०१/०१/२०२५ रोजी कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदार नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**सही**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार सिंदखेड राजा

# तिळगुळ घ्या, गोड गोड बोला!

लोकनेता न्यूज नेटवर्क




संपूर्ण भारत देशाला दिशा देणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र! महाराष्ट्राच्या प्रथा,परंपरा,सण,समारंभ आणि उत्सव नेहमीच भारतभर काय जगभर चर्चेत असतात! याची कारणे अनेक आहेत. जसे की इथली कृषी संस्कृतीशी इथला माणूस हा एकरूप झालेला आढळून येतो. महाराष्ट्राची ओळखच मुळी इथल्या विविधांगी समारंभांनी झालेली दिसून येते. इथे साजरा होणारा प्रत्येक सण किंवा उत्सव आपल्या दैनंदिन जीवनाला काहीतरी दिशादर्शी असतोच! गुरुपौर्णिमेला प्रारंभ झालेले मराठी सण-उत्सव दिव्यांच्या दिपावलीने काहीसे थांबतात. त्यानंतरही मराठी सणांची रेलचेल काही थांबत नाही. इथले सर्वच सण कृषी संस्कृती,निसर्गातील होणारे अमुलाग्र बदल आणि त्याचा मानवी जीवन,आचार,विचारांवर होणारा मूलगामी प्रभाव याचा एकदम निकटचा संबंध असतो. सर्वच सण आपापली प्रतीकं मोठ्या सन्मानाने जपतांना आपला काळ आणि वेळ जागृत करून जातात. बहुतांश मराठी सण-समारंभ,कृषी संस्कृती आणि सूर्य याचा अत्यंत जवळून संबंध पाहायला मिळतो. दिवाळीत दिव्यांचा उत्सव असतो! अमावस्येच्या रात्री घरोघर दिवे लावून तमोगुण घालवून सर्वत्र ज्ञानाचा प्रकाश केला जातो! त्याचप्रमाणे आज मकरसंक्रांती म्हणजे प्रत्येक वर्षातील अत्यंत महत्वाचा उत्सव! या दिवसाला एक महापर्व म्हणून सुद्धा संबोधले जाते. आजपासून सृष्टीत अमुलाग्र बदल व्हायला प्रारंभ होतो. आजमकरसंक्रांतीच्या दिवशीसूर्यधनूराशीतूनमकरराशीत प्रवेश करतो. सूर्याचे उत्तरायण आधीच म्हणजे २१-२२ डिसेंबरलाच सुरू झालेले असते. अर्थातच त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरूच असते. पृथ्वीवरून पाहिले असता,२१-२२ डिसेंबरपासून सूर्याच्या उगविण्याची जागा दिवसेंदिवस उत्तरेकडे सरकते, म्हणजेच उत्तरायण!इंग्रजी महिन्यानुसार हा दिवस १४किंवा १५जानेवारीरोजी येतो.माणसाच्या प्रकृतीच्या दृष्टीने हे सर्वच उत्सव महत्वाचे प्रतिक म्हणून ओळखले जातात. तसा हा उत्सव तीन दिवस साजरा केला जातो. मकर संक्रांतीच्या अगोदरच्या दिवसाला भोगी म्हणतात. या दिवशी तीळ लावून बाजरीची भाकरी आणि त्या सोबत भोगीची भाजी म्हणजेच सर्व भाज्या,बोर,जांब (पेरू),उस,वाटाणा,शेंगदाणा,तीळ इत्यादी एकत्र करून भाजी केली जाते. अशीच भाजी महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यात वेळ अमावस्येला भज्री नावाने ओळखली जाते. वेळ अमावस्या आणि त्यानंतर आलेली संक्रांत हे सर्वच मानवाच्या सुदृढ जगण्याच्या दृष्टीने साजरे केले जाणारे महत्वपूर्ण सण आहेत.

आज स्त्रियांचा एकमेकींना वाण देण्याचा दिवस! काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागात वेगळ्या प्रकारचे वाण देण्याची प्रथा होती. गावातील सर्व सवाष्ण स्त्रिया आपापल्या शेतातील ऊस,पेरू,बोरे,गाजर,भुईमुगाच्या शेंगा,वाटाण्याच्या शेंगा एकत्र करून आजच्या दिवशी एकमेकींना वाण म्हणून ओटीत भरायच्या. याच्या जोडीला घरचा तीळ आणि गावरान गुळापासून बनवलेले तिळाचे लाडू देवून एकमेकांना शुभेच्छा दिल्या जायच्या. अलीकडच्या काळात वाणाचे पदार्थ गायब होऊन त्याजागी जीवनावश्यक वस्तूचे वाण द्यायची प्रथा सुरु झाली. शेतकऱ्यांच्या शेतात पिकणारे बहुतांश वाण हल्ली दिसत नाहीत. जो तो कॅशक्रॉपच्या मागे लागलाय. असा हा मकरसंक्रांतीचा दिवस मोठ्या उत्साहाने आणि जागृत होऊन साजरा केला जातो.

आजपासून तिळातिळाने थंडी घटते. उत्तरायणात हळूहळू माणसाची पचन संस्था जास्त कार्यक्षम होण्यासाठी आपण उष्ण आहार सेवन केले पाहिजे याचे हे प्रतिक आहे. बाजरीची भाकरी उष्ण आहे. थंडीच्या काळात शरीरात उष्णता निर्माण करण्याचे कार्य बाजरीची भाकरी करते. त्याच्या जोडीने आज तिळगुळाचे लाडू देऊन एकमेकांना तिळगुळ घ्या गोड गोड बोला! असे अभीष्टचिंतन केले जाते. तीळातील स्निग्धता आणि गुळातील गोडवा-उष्णता मानवी शरीराला अत्यंत लाभकारी आहे. याच अनुषंगाने आपण एकमेकांना केवळ शुभेच्छा देत नसून एकमेकांना तिळगूळ देऊन आपापल्या आरोग्याची जपणूक करण्याची संवेदना प्रसारित करत असतो. ही बाब आपल्या सर्वांसाठी निश्चितच दिशादर्शी आणि आदर्श म्हणावी लागेल.

अलीकडच्या काळात माणसाला मोबाईल आणि मिडिया नावाच्या विषारी साधनांनी विळखा घातला आहे. माणसामाणसांतील संवाद खुंटला आहे. आजूबाजूला बसून माणसे एकमेकांना बोलतांना दिसत नाहीत. सगळे लोक मोबाईलशी खेळत आहेत. असे असतांना माणसातील भावनिक संवाद आणि दिलखुलास हसणे अत्यल्प झाले आहे. ही आपल्या सर्वांसाठी मोठी धोक्याची घंटा आहे. आज एकमेकांना तिळगूळ देऊन आपण एकमेकांच्या आरोग्याच्या शुभेच्छा देण्याची वेळ आली आहे. माणसातील घटणारा संवाद,वाढलेले अंतर हे आपल्याला कमी करावे लागेल. एकमेकांशी बोलतांना, आपल्या परंपरा अबाधित ठेवतांना पुढच्या पिढीला सामाजिक एकोपा,निरोगी आयुष्य आणि परंपरांचा वैश्विक वसा-वारसा पुढे चालवण्याचा संदेश द्यावा लागेल. त्यासाठी आज घराघरात आणि कॉलनीत तिळगुळाचे सामुहिक कार्यक्रम होणे काळाची गरज आहे. तिळाची स्निग्धता आणि गुळाचा गोडवा सर्वत्र प्रसारित होण्यासाठी मकर संक्रांति सणांची नितांत गरज आहे.

या सगळ्या गोष्टींच्या जोडीने आज युवा पिढीला शांती, संयम, जाती-धर्माच्या पलीकडे विचार करण्याचे संस्कार रुजविण्याची नितांत गरज आहे. अलीकडच्या दोन वर्षात जातीयवादाने समाजात थैमान घातले आहे. यासाठी आपण सर्व जात, धर्म, पंथाच्या मंडळींनी या भेदभावाला बळी न पडता सामाजिक सलोखा राखण्याचे महत्वपूर्ण कार्य करण्याची नितांत गरज आहे. सोबतच आरोग्याचे धडे देण्याची गरज आहे. तरुणांचे जाड भिंगाचे चष्मे,चेहऱ्यावर नैराश्य आणि मोबाईलवर बोटे पहिली की;काळजात धस्स होते! तरुण कसा दिसावा?तो तेजस्वी-ओजस्वी असला पाहिजे. बलदंड देहयष्टी,चेहऱ्यावर तेज आणि डोळ्यात भविष्याची स्वप्ने असणारा! युवक-युवती खऱ्या अर्थाने उद्याच्या स्वावलंबी देशाची ओळख असला पाहिजे,परंतु असे चित्र दुर्मिळ झाले आहे. बलदंड देहयष्टीचे तरुण केवळ व्यायामशाळेच्या पोस्टरवर दिसतात. त्यासाठी सर्वांनी मोबाईलवर गेम खेळण्याऐवजी मैदानावर खेळावे लागेल. दंड बैठका माराव्या लागतील. मजबूत शरीरात मजबूत मनाचे वास्तव्य असते. तरुणांचे शरीर आणि मन मजबूत करावे लागेल. असे झाल्यास घराघरात बलदंड देशभक्त तयार होतील. हा संदेश घराघरात जरी मोबाईलच्या द्वारे जात असला तरी आता आपल्याला दररोज काही काळ तरी ग्रंथ वाचनाची सवय लावून घ्यावी लागेल. ग्रंथांना आपले गुरु मानून त्यांच्या विचारांच्या गुरुत्वाकर्षनाने आपण प्रभावित होऊन आपल्या जीवनाला स्वतः नवविचारांनि सुशोभित करावे लागेल. असे झाल्यास आजपासून प्रारंभ होणाऱ्या मकर संक्रांतिच्या महपर्वाचा खऱ्या अर्थाने आपल्याला लाभ होईल. तसेच घराघरात तिळगुळ वाटप,बाजरीच्या भाकरीचे सेवन,महिलांमधील वाणाची देवाण घेवाण दिशादर्शी होईल. याच्या जोडीने वाणात एखादी छोटी वस्तू देण्याऐवजी एखादे पुस्तक देऊन ज्ञानाच्या वाणाचे वाटप करावे लागेल. असे झाल्यास शरीराच्या बळकटीबरोबरच समाजाला मानसिक बळकटी येईल! असे होणे म्हणजे यावर्षीपासून सुरु झालेला हा महापर्वाचा संक्रंत सण आपल्याला नव्या दिशेने घेऊन जाईल यात तिळमात्र शंका नाही. तेंव्हा,खुंटलेला संवाद वाढवा, वाढता जातीभेद संपवा आणि येणाऱ्या पिढीसाठी बलदंड देहयष्टी, मजबूत मनाची तरूण पिढी तयार होऊन येणाऱ्या काळातील मकर संक्रांतिचे उत्सव हे तरुणाईचे सोहळे होतील! तिळगुळ घ्या,गोड गोड बोला!

**-प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये**
**कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ**
**जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो.९१५८०६४०६८**

दैनिक लोकनेता



# खानवटे येथील ग्रामविकास अधिकारी धनंजय देशमुख यांची २०,८४,१३०/ रुपयांची अफरातफर

## लाखो रुपयांची अफरातफर करून देखील देशमुखांचा जावई लाड का ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खानवटे ता.दौंड येथील ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी धनंजय दिनकरराव देशमुख या महाशयांनी सन २०२१ ते २०२२ या कालावधीमध्ये रक्कम रुपये २०८४१३०/ एवढी रक्कम ग्रामनिधीच्या बँक खात्यातून काढून अफरातफर केली असून तसा स्वयंस्पष्ट अहवाल सहाय्यक निबंधक स्थानिक निधी लेखा परीक्षण पुणे,(ऑडिटर) यांनी अहवाल दिनांक ४ जानेवारी २०२४ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना एक वर्षापूर्वी देऊन देखील कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

याचाच अर्थ ग्रामविकास अधिकारी धनंजय देशमुख यांचा जावई लाड पुरवला जात आहे,अशी खमंग चर्चा खानवटे ग्रामस्थांमध्ये जोरात सुरू आहे खानवटे गावाच्या




ग्रामविकासासाठी आलेल्या लाखो रुपयांच्या ग्रामनिधीची अफरातफर करणाऱ्या घोटाळेबाज महाशयांकडे आजही खानवटे ग्रामपंचायतीचा दुसऱ्यांदा पदभार का दिला आहे याचे कोडे न सुटणारे असून या महाशयांनी जिल्हा परिषद पुणे येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना मलिदा चारून काही दिवसापुर्वी स्वतःची बदली करून घेतलेली आहे.

परंतु हा एवढाच घोटाळ्याचा एकच विषय नसून ग्रामपंचायतीच्या इतरही बँक खात्यातील आणि विकासकामातील अनेक घोटाळे या महाशांनी केलेले आहेत असे निदर्शनात येत आहे. त्यामुळे मा. प्रशांत काळे गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी खानवटे ग्रामपंचायतीचे दफ्तर तपासणीचे आदेश दिलेले आहेत.तसेच हे महाशय ग्रामपंचायत कार्यालयात फक्त पंधरा दिवसातून एकच दिवस गावाला भेट देत असतात,त्यामुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असून ग्रामस्थांना याचा नाहक त्रास सोसावा लागत असून

लवकरच ग्रामपंचायतीच्या अफरातफरी बाबत दूध का दूध पानी का पानी होईल या आशेवर आजही ग्रामस्थ बसलेले आहेत.

याबाबत ग्रामविकास अधिकारी धनंजय देशमुख यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की वरील संबंधित कालावधीमध्ये माझी डि.ए.सी ग्रामपंचायत ऑपरेटर दत्तात्रय शेळके यांच्याकडे होती,त्यामुळे तत्कालीन सरपंच आणि ऑपरेटर दत्तात्रय शेळके यांनी माझे अनुपस्थितीत परस्पर ऑनलाईन पैसे काढले.तसेच मला ब्लॅकमेल करून संबंधित ऑडिटर मला तिन लाख रुपये मागत होते,ते मी दिले नसल्याने खोटे ऑडिट पॉइंट काढून माझ्या विरोधात एवढ्या रक्कमेचा चुकीचा अहवाल दिला आहे.याबाबत विद्यमान सरपंच अनिता पवार यांना विचारले असता ते म्हणाले माझ्या कार्यकालातील हा विषय नसल्याने मला काहीच माहिती नाही.

> **दि.१७ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायत खानवटे येथील संपूर्ण दफ्तर तपासणी करून लवकरच अहवाल गटविकास अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात येईल.**
> **श्रीयुत खांडेकर विस्तार अधिकारी पंचायत समिती दौंड.**

> **भूमिगत गटरचारीच्या कामाचे बिल अदा करण्यात येऊ नये असा लेखी आदेश देऊन देखील ग्रामविकास अधिकारी देशमुख यांनी आमचे परस्पर आंदाजे ५०% गटरचारीचे बिल अदा केलेले आहे. संबंधित कामाच्या चौकशीसाठी आम्ही दिनांक १६ जानेवारी रोजी खानवटे गावात स्थानिक चौकशीसाठी येणार आहे.**
> **सौ.नेहा डहाके उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा पंचायत समिती दौंड.**

# वाचनातून व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते-डॉ.भोपाळे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अर्धापूर । प्रतिनिधी**

व्यक्तिचा भावनिक, वैचारिक, सामाजिक आणि बौध्दिक बौध्दिक विकास हा वाचनातून होतो..ज्या क्षेत्रात विकास करायचे आहे, त्या क्षेत्रातील ग्रंथ संपदेचे वाचन ,मनन आणि चिंतन केल्यास त्या त्या क्षेत्रात यश प्राप्त होते. म्हणून सतत वाचन करावे. वाचनातून माणूस समृध्द होतो असे प्रतिपादन सुप्रसिध्द लेखक हनुमंत भोपाळे यांनी केले. ते अर्धापूर येथील शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्या मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत 'लेखक आपल्या भेटीला' कार्यक्रमात निमंत्रित लेखक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.जे.सी. पठाण होते. याप्रसंगी विचारपीठावर डॉ. रघुनाथ शेटे, डॉ . साईनाथ शेटोड, डॉ.संगीता घुगे, डॉ.एस.पी. औरादकर, डॉ.काजी मुक्तारोदिन यांची विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी हनुमंत भोपाळे यांनी महाविद्यालयास ग्रंथ भेट दिली.. हनुमंत भोपाळे पुढे बोलताना म्हणाले की, शब्दांची कलात्मक गुंफून करून लेखक होता येते.. लेखनाला संघटनशक्तीची जोड असणे आवश्यक आहे...माणूस जोडणे म्हणजे देश जोडणे होय... शासन वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी प्रयत्न करत आहे, ही बाब स्तुत्य आहे. वाचन संस्कृतीबरोबर कालानुरूप लेखन झाले पाहिजे, यासाठी लेखन संस्कृती जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य जे.सी.पठाण म्हणाले प्रोफेसर हनुमंत भोपाळे यांनी शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्या पायाभरणीपासून महत्वपूर्ण योगदान दिले आहे.. प्रभारी प्राचार्य म्हणून त्यांनी अनेक राबवले. ते उपक्रमशील आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक त्यांची ओळख आहे. वाचनसंस्कृती रूजवण्यासाठी ग्रंथभेट देतात आणि लेखनही करतात...हा कार्यक्रम लेखक आपल्या भेटीला असला तरी मी म्हणेन आपला माणूस आपल्या भेटीला असा हा कार्यक्रम आहे. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ.ल.ना.वाघमारे यांनी केले. तर आभार डॉ.संगीता घुगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.उमाकांत शेळके, बालाजी कवठेकर आदींनी परिश्रम घेतले. यावेळी प्राध्यापकवृंद आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

> **लहुजी शक्ती सेना पुणे जिल्हा युवक अध्यक्ष पदी निवड मा विशाल उर्फ बंटी जोगदंड तसेच लहुजी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे साहेब प्रदेशाध्यक्ष कैलास दादा खंदारे युवक प्रदेशाध्यक्ष सचिन भाऊ क्षीरसागर विद्यार्थी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष हेमंत भाऊ खंदारे महाराष्ट्र अध्यक्ष अमोल भाऊ चव्हाण पुणे जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ जगताप महाराष्ट्र सदस्य नितीन भाऊ वायदंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.(लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी:अण्णासाहेब साबळे)**



# व्हि.पी.के उद्योग समूहाच्या वतीने खोडवा ऊस पीक व्यवस्थापन शेतकऱ्यांसाठी माहिती




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

शेतकरी बांधवांनो ऊस तुटून गेल्यावर लगेच पाचट कुट्टी करून बुडके छाटणी करून त्यावर क्लोरोपायरिफॉस २०% आणि कार्बेन्डाझिम याची फवारणी करून घ्यावी.

पाचट अजिबात जाळू नये जाळल्यास सुपीक जमिनीचा थर जळून उपयुक्त जिवाणू मरतात आणि पाचटा पासुन मिळणारे सेंद्रीय खत देखिल नष्ट होते.

जमिनीत वाफसा असेल तर बगला फोडून घ्यावे. खोडवा उसाच्या मुळ्या या सेट असतात त्यामुळे त्याला जितक्या लवकर खते द्याल तितक्या लवकर त्याची वाढ सुरू होते त्यामुळे बगला फोडून झाल्यावर लगेच खालील डोस मातीआड करून पाणी द्यावे.

पाचाटाला स्वतः न कुजू देता ते लवकर कुजवण्यासाठी एकरी २ बॅग सिंगल सुपर फॉस्फेट आणि १ बॅग युरिया विस्कटून घ्यावे आणि पाचट वर डिकम्पोजर ची फवारणी करून घ्यावी.जमीन जास्त ओल असेल तर लवकर पाणी देऊ नये. जमीन थोडे तापू देऊन नंतर खत मातीआड करुन पाणी द्यावे.

शेणखत , कारखान्याची मळी , कोंबडी खत इ उपलब्ध असल्यास बगला फोडणी अगोदर सरीत टाकून मग बगला फोडून घ्यावे.

खत व्यवस्थापन

पहिला डोस ४ बॅग सिंगल सुपर फॉस्फेट + १ बॅग पोटॅश ( हे खत घेतल्यास गंधक घेऊ नये ) किंवा २ बॅग १२:३२:१६ किंवा २ बॅग १०:२६:२६ किंवा २ बॅग २४:२४:०० + १ बॅग पोटॅश तसेच सोबतीला १ बॅग युरिया+ १० किलो गंधक घ्यावे.सूक्ष्म आणि दुय्यम अन्नद्रव्याची कमतरता भागवण्यासाठी खालील खते ६ ते ८ दिवस शेणखतात मुरवत ठेवून मग द्यावे.५ किलो झिंक सल्फेट,५ किलो फेरस सल्फेट,२५ किलो मॅग्नेशियम सल्फेट सूक्ष्म अन्नद्रव्य १० किलो सिलिकॉन १० किलो २० टोपले शेणखत घेऊन त्यात मुरवत ठेऊन मग द्यावे. (वरील सर्व खते मातीआड करून दिल्यास त्याची उपलब्धता वाढते.)वरील प्रोसेस पूर्ण झाल्यावर ३० दिवसांनी वसंत ऊर्जा ची फवारणी करून घ्यावी. अशी माहिती सावंत एस जे ऊस विकास अधिकारी व्हि पी के उद्योग समूह यांनी दिली.

# मानवतेचे प्रतिबिंब उमटविणारे एकच साहित्य असते-डॉ.वासुदेव मुलाटे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

मानवाच्या दुःखाची व मानव मुक्तीचे साहित्यातून प्रकटीकरण होत असताना ते एक साहित्य एकमेव साहित्य असते त्यात दलित – ग्रामीण असा भेद करण्यात येऊ नये , शोषित , वंचित हे घटक साहित्याचे केंद्रबिंदू असले पाहिजेत असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.वासुदेव मुलाटे यांनी काढले .

पानसरे महाविद्यालय अर्जापूर येथील मराठी विषयाचे प्रा. डॉ.नारायण शिवशेट्टे लिखित ' ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय एक अभ्यास ' या समीक्षा ग्रंथ प्रकाशन सोहळ्याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना आपली भूमिका मांडली.

स्वरूप प्रकाशन पुणे तर्फे आयोजित समीक्षा ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन पीपल्स कॉलेज नांदेड येथील कै. नरहर कुरुंदकर सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आले ' ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय : एक अभ्यास' या समीक्षा ग्रंथावषयी आपले भूमिका मांडत असताना त्यांनी , ' ग्रामीण आत्मकथनावर अधिक समीक्षा झालेली नाही, मुळात ग्रामीण आत्मकथने कमी प्रमाणात लिहिली गेली, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यासाठी सत्य सांगण्याची हिंमत लागते.ही हिंमत दाखवणाऱ्या आत्मकथनावर केलेली समीक्षा अधिक मोलाचे वाटते ' अशा शब्दांत मत व्यक्त केले आहेत.

'ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय : एक अभ्यास' या प्रकाशित समीक्षा ग्रंथावर भाष्य करीत असताना प्राध्यापक डॉ.सिद्धोधन कांबळे यांनी ,' साहित्यिकांनी साहित्य निर्मिती करत असताना गाव व गावकुसाबाहेरील असा भेद करून साहित्य निर्माण करू नये . त्यामुळे माणूस हा साहित्यातला केंद्रबिंदू राहत नाही.' अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली .या ग्रंथावर भाष्य करताना कथाकार डॉ.शंकर विभुते यांनी या समीक्षा ग्रंथाची ओळख करून देत आजच्या पिढीने वाचन संस्कृती कशी विकसित केली पाहिजे या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले. याप्रसंगी जेष्ठ साहित्यिक रामप्रसाद तौर आणि जेष्ठ लेखिका डॉ.मथु सावंत यांची शुभेच्छापर भाषणे झाली.




समीक्षा ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील, डॉ.जगदीश कदम , दैनिक उद्याचा मराठवाडा चे संपादक राम शिवडीकर, डॉ. सुरेश सावंत, डॉ.भगवान अंजनीकर, दत्ता डांगे डॉ. अनंत राऊत, डॉ.प्रकाश मोगले डॉ.श्रीनिवास पांडे, दत्ता तुमवाड, के. ई. हरिदास, डॉ.मा.मा.जाधव, डॉ डी. एन. मोरे, डॉ. जे. टी. जाधव, डॉ आनंद नरंगलकर, डॉ आर जे गायकवाड, डॉ बाळु दुगडुमवार, अमृत तेलंग, शिवाजी जोगंदड, बाभळी बंधारा कृती समितीचे सचिव जेष्ठ नागरिक शंकरराव आनंदराव पाटील जाधव रोशनगावकर,येळगे सर,छपरे सर, विष्णुकांत गंभीरे सर,माधव ईरना पा माळगे,राम पाटील माळगे, सिध्देश्वर पाटील शिवशटटे, सनंतकुमार पा माळगे, मन्मथ पाटील माळगे, त्रिंबक पाटील माळगे, साईनाथ पाटील माळगे, कपिल पाटील शिवशटटे, माधवराव अशोक पाटील शिवशटटे,संकेत पाटील माळगे, रोशनगावकर परीवार तसेच नांदेड जिल्ह्यातील शिक्षण, साहित्य, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि पानसरे महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

अतिशय भव्य दिव्य अशा समीक्षा ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ.गोपाळ चौधरी तर आभार संतोष साखरे यांनी व्यक्त केले आहे.

# शेगांव येथे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त १०८ सामूहिक सूर्यनमस्कार कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलडाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दि.१२ जानेवारी रोजी मथुरा लॉन्स शेगाव येथे १०८ सामूहिक सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वयंसेवी संस्था, नागरिक व विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्यनमस्कार कार्यक्रमात स्वयंस्फुर्तीने सहभागी झाले होते.क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा तसेच कस्तुराई बहुउद्देशीय संस्था, पतंजली परिवार शेगाव जायंट्स ग्रुप शेगाव यांच्या संयुक्त सामूहिक सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते. भारत स्वाभिमान प्रांत सह कोषाध्यक्ष पी. आर. सुलताने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून राष्ट्रीय युवा दिनाचे महत्त्व सांगितले. कस्तुराई बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष व योग शिक्षीका कालिंदी असंबे यांनी बालयोग साधक, युवा योग साधक, साधिका व विद्यार्थ्यांकडून १०८ सूर्यनमस्कार करून घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करुन दिप प्रज्वलनाने झाली. यावेळी शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन पाटील, पतंजली जिल्हा प्रभारी चतुर्भजी मिटकरी, महिला पतंजली जिल्हाध्यक्ष श्रीमती चांडक, पतंजली कृषी सह कोषाध्यक्ष निळकंजी साबळे, जायंट्स फेडरेशन अध्यक्ष व मथुरा लॉन्सचे संचालक विनायक भारंबे, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर उपस्थित होते.




नवोदय विद्यालय, चिन्मय विद्यालय स्वामी विवेकानंद शाळा, गो ग्रीन संस्थेचे सदस्य, लावण्या योगा क्लासेसच्या सर्व योगसाधिका, विद्यार्थ्यांचे पालक वर्ग व शेगाव मधील इतर योगप्रेमींनी मोठ्या प्रमाणात १०८ सूर्यनमस्कार मध्ये सहभाग घेतला. लावण्या योगा क्लासेसच्या वैष्णवी उमाळे, हर्षदा बैतुले, स्वाती गोल्हर, मेधा कुलकर्णी, प्रणिता कऱ्हे, ज्योती धुमाडे, विना लाखे, रूपाली राहटे, योगिता शेंडे, संगीता खेडकर, विद्या नारखेडे, टाले मॅडम या महिलांनी सुद्धा १०८ सूर्य नमस्कार घालून शारीरिकरित्या तंदुरुस्त असल्याची प्रेरणा दिली. सूर्यनमस्कार काढलेल्या सर्व योग साधकांना प्रमाणपत्राचे वाटप जिल्हा क्रीडा अधिकारी,बी.एस. महानकर व ठाणेदार नितीनजी पाटील यांच्या हस्ते देऊन योग साधकांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रो ग्रीन फाउंडेशन सदस्य विठ्ठल जी मिरगे यांनी तर आभार प्रदर्शन विनाय भारंबे यांनी केले. कार्यक्रमाकरिता पतंजली परिवार शेगाव जायंट्स ग्रुप व कस्तुराई बहुउद्देशीय संस्था शेगाव व क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# वै.ह.भ.प मामासाहेब दांडेकर स्मृतिदिन सोहळा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**





शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित स्थानिक दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे शनिवार दिनांक ०४ जाने.२०२५ रोजी वै.ह.भ.प मामासाहेब दांडेकर स्मृतिदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

दर वर्षी ०४ जानेवारीला शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित सर्व शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये वै.ह.भ.प मामासाहेब दांडेकर यांच्या ऋणातून उतराई होण्याचा एक प्रयत्न म्हणून हा स्मृतिदिन सोहळा साजरा करण्यात येतो.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. दाभाडे सर केल्यानंतर ह.भ.प. वेद महाराज पैठणकर यांच्या नेतृत्वात ज्ञानेश्वरीतील बाराव्या अध्यायाचे सामूहिकरीत्या पारायण करण्यात आले.या सोहळ्यादरम्यान प्रवचन करत असताना मुख्य प्रवचनकार ह.भ.प.श्री.पैठणकर महाराज युवकांनी भारतीय संस्कृतचे जतन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राठोड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. दंदाले सर यांनी केले.प्रसंगी व्यासपीठावर ह.भ.प.श्री वेद महाराज पैठणकर,ह.भ.प विकास महाराज जायभाये, प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर,पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास सर,शारीरिक शिक्षक श्री.आर.एल.राठोड सर यांच्यासह सर्व प्राध्यापक – प्राध्यापिका तसेच शिक्षक – शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होत्या.

# रासेयो विशेष निवासी शिबिरा मध्ये विविध विषयांवर चर्चासत्र

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत हिवाळी श्रमसंस्कार विशेष निवासी शिबिर ग्राम खल्याळ गव्हाण येथे पार पडले. यामध्ये शोष खडडे, बालविवाह प्रतिबंधक कायद्याविषयी जनजागृती, महिला आत्मसंरक्षण, आरोग्य जानजागृती, मोबाईलचे दुष्परीणाम, ग्रामस्वच्छता, पर्यावरण जागृती, शैक्षणिक जनजागृती, कृषि ज्ञान प्रसार, जलसंवर्धन, मतदाना विषयी जनजागृती अशा विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केले होते. यामध्ये सोशल मिडीया आणि युवा पीढी, प्रा. मधुकर जाधव,व्यंकटेश महाविद्यालय, दे. राजा, जल संर्वधनाविषयी मार्गदर्शन, श्री भगवान कच्छवे, तालुका कृषि अधिकारी,



दे. राजा, जमिनीच्या आरोग्यासाठी माती परीक्षणाचे महत्व प्रा. विलास सातपुते, स. कृ. म., दे. राजा, राष्ट्रीय सेवा योजना व आजचा युवक प्रा. किरण ठाकरे, स. कृ.म., देउळगांव राजा, बक–यांचे लसिकरण व पशुंच्या आरोग्याबाबत जनजागृती डॉ. एस. आर. चिरफरे, पशुधन विकास अधिकारी दे.राजा, महिलांचे आरोग्य, समस्या व उपाययोजना प्रा. अश्विनी जाधव, स.कृ.म, देउळगांव राजा, मानव व पर्यावरण वनश्री जनाबापु मेहेत्रे, धरती बचाओ परीवार, रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीर, श्री स्वामी समर्थ रक्तपेढी जालना, आरोग्य शिबीर डॉ. प्रविण वानखेडे, वैद्यकीय अधिक्षक, देउळगांव राजा, फळभाज्या प्रक्रिया व परसबाग लागवड प्रा. सोनाली इंगळे, स.कृ.म., दे.राजा या विविध विषयांवर मान्यवरांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा किरण ठाकरे, सह कार्यक्रम अधिकारी प्रा अश्विनी जाधव, प्रा विलास सातपुते, प्रा विकास म्हस्के व प्रा सोनाली इंगळे यांनी हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. तर या सात दिवसीय शिबिरामध्ये ४० रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग होता.

## जिल्ह्यातील दुसरा सौर प्रकल्प कार्यान्वित


# बोरी सौर प्रकल्पामुळे ८३० शेतकऱ्यांना मिळणार दिवसा वीज

## प्रकल्प पुर्तीसाठी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांचे विशेष प्रयत्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलडाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात ७ मेगावॅट क्षमता असलेला मेहकर तालुक्यातील बोरी सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे ३३ के.व्ही. उखळी उपकेंद्राअंतर्गत ८३० शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्याची सोय झाली आहे. तथापि पळशी बुद्रूक येथील ५ मेगावॅट सौर प्रकल्प सुरू झाल्यामुळे त्या प्रकल्पातून परिसरातील ७०० शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असल्याची माहिती महावितरण प्रशासनाने दिले आहे.



शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा, अखंडित व भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यात ६७ विकेंद्रीत सौर प्रकल्पातून ५२ उपकेंद्रासाठी १९६ मेगावॅट वीज निर्मित करण्यात येणार आहे. त्यातील पळशी बुद्रूक आणि बोरी असे दोन प्रकल्प सुरू झाले आहे.त्यामुळे या दोन प्रकल्पातून १ हजार ५३० शेतकऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार आणि दिवसा वीज द्यायला सुरूवात झाली आहे. जिल्ह्यातील बोरी सौर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टिने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडून विशेष प्रयत्न करण्यात आले. मेघा इंजिनिअरींग(चएखड)या विकासकाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आलेला मेहकर तालुक्यातील बोरी हा सौर प्रकल्प ७ मे.वॅ.क्षमतेचा असून ३५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आला आहे. तसेच २५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आलेला बुलडाणा तालुक्यातील पळशी बुद्रूक येथील प्रकल्प ५ मे.वॅ.क्षमतेचा असल्याची माहिती महावितरण प्रशासनाने दिली.

# उद्योजकता विकास केंद्राव्दारे शेळी,कुक्कुट पालन प्रशिक्षण

## नोंदणी करण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलडाणा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्र बुलढाणामार्फत शेळी, कुक्कट, गाय व म्हैस पालन प्रशिक्षणाचे आयोजन दि. २१ ते २५ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. उद्योग, व्यवसाय करू इच्छिणारा सुशिक्षित बेरोजागार युवक–युवतीनी दि. २१ जानेवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी प्रदीप इंगळे यांनी केले आहे.

प्रशिक्षणामध्ये शेळी, कुकुट, गाय व म्हैस पालनाचे तंत्र, प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन रोग, लक्षणे, खाद्य निर्मिती, चाऱ्यांचे प्रकार, शासकीय योजना व उद्योग सुरु करण्यासंदर्भातील माहिती पाच दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमात देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश सुशिक्षित बेरोजगारांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण देऊन स्व:ताचा व्यवसाय सुरु करावा हा आहे.



प्रशिक्षणात प्रवेश घेणारा उमेदवार हा किमान पाचवी पास, वयोगट १८ ते ५० वर्षे असावा. प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणाची नोंदणी दि. २१ जानेवारीपर्यंत कार्यालयीन वेळेत सुरु आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र तहसिल कार्यालयजवळ, चिखली रोड, बुलडाणा येथे किंवा मो. नं. ९०११५७८८५४, ८२७५०९३२०१ वर संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी गणेश गुप्ता यांनी केले आहे.

# वलाना येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील वलाना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वलाना येथे मोठ्या उत्साहा मध्ये राजमाता जिजाऊ माँ साहेब व युवकाचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान श्री आर एस राजगुरु सर हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून केंद्र प्रमुख श्री के.एन.सपकाळ श्री आर डी नेहुल् उमेश बुकशेटवार , रंजना राखुंडे मॅडम, विलास सय्यद राव आदींची मंचावर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेतील बहुतांश विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री रामेश्वर नेहुल सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री उमेश बुकशेट वार सर यांनी केले.तर कार्यक्रमाचे यशस्वीरित्या संचालन वर्ग सहावीची विद्यार्थिनी कु. वेदिका हेंबाडे हिने केले .या सर्व कार्यक्रमाचे आयोजन वर्ग सहावीतील विद्यार्थिनी विद्यार्थी यांनी केले.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904